# २. भारतीय संगीताचा इतिहास

सर्व ललित कलांमध्ये संगीत कलेचा उदय सृष्टिनिर्मितीबरोबरच झाला. सामाजिक परिवर्तने व संगीतातील परिवर्तन जणू हातात हात घालूनच चालत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. भारतीय संगीताच्या इतिहासाचे अध्ययन करण्यासाठी इतिहासाचे चार कालखंड करता येतील.

१) आदिम कालखंड

२) प्राचीन कालखंड

३) मध्ययुगीन कालखंड

४) अर्वाचीन कालखंड – अर्वाचीन कालखंडाचे दोन उपकालखंड करता येतील.

अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंड

ब) स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय संगीताचा इतिहास व विकास कशा पद्धतीने झाला हे पुढीलप्रमाणे पाहता येईल.

## २.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड (१८५०–१९४७)

भारतीय संगीताचे खरे स्वरूप विकसित झाले ते १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय संगीताची स्थिती अभ्यासण्यासाठी आपल्याला भूतकाळात डोकवावे लागेल.

**१) ब्रिटिशांच्या काळातील संगीत :** भारतीय संस्कृती व भारतीय कला यांकडे इंग्रजांनी कधीही लक्ष दिले नाही. त्यामुळे संगीत कलेला त्यांच्याकडून राजाश्रय मिळाला नाही आणि संगीत समाजातील कनिष्ठ लोकांच्या हातात गेले. लोकांचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. सुसंस्कृत घरात संगीताचे नाव घेणे सुद्धा पाप ठरू लागले. काही गुणी व्यक्तींनी संगीत कलेची ज्योत आपल्या परिश्रमाने तेवत ठेवली.

**२) ब्रिटिश काळात संगीताचे संवर्धन :** भारतीय संगीताचा मळा फुलवण्यासाठी काही कलावंत व संस्थानिकांनी अहोरात्र कष्ट घेतले. देशात ग्वाल्हेर, बडोदा, रामपूर, मेहर अशी छोटी छोटी संस्थाने होती. या संस्थानिकांनी अनेक कलावंतांना दरबारी गायक म्हणून नियुक्त केले. यातूनच संगीतातील प्रमुख घराणी जन्माला आली. इंग्रज शासकांनी भारतीय संगीत कलेची उपेक्षा केली असली तरीही सर विलियम जोन्स, कॅप्टन डे, कॅप्टन विलार्ड यासारख्यांनी कुतूहलापोटी भारतीय संगीताचे अध्ययन केले व त्यावर अनेक ग्रंथ लिहिले. पर्यायाने लोकांचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला.

**३) ब्रिटिश काळातील ग्रंथ निर्मिती :** जयपूरचे राजे प्रतापसिंह यांनी संगीत कलावंताच्या मदतीने 'संगीत सार' या ग्रंथाची निर्मिती केली. यामुळे संगीताला शास्त्रीय बैठक मिळाली. महमद रझा यांनी 'नगमाते आसफी' हा ग्रंथ लिहिला. कृष्णानंद व्यास यांनी 'संगीत रागकल्पद्रुम' नावाचा ग्रंथ लिहिला. ज्यामध्ये हजारो धृपदे, ख्याल आणि अन्य गीते समाविष्ट केली. सुरेंद्र मोहन टागोर यांनी 'युनिव्हर्सल हिस्टरी ऑफ म्युझिक' आणि 'म्युझिक फ्रॉम व्हेरिअस ऑथर्स' हे संगीतविषयक ग्रंथ लिहून संगीताला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**४) पं. पलुस्कर व पं. भातखंडे यांचे योगदान :** ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत भारतीय संगीत लयाला जात असतानाच महाराष्ट्रातील दोन थोर विभूतींनी संगीत क्षेत्रात कार्य केले ते म्हणजेच पं. विष्णु दिगंबर पलुस्कर व पं. विष्णु नारायण भातखंडे होय

**५) संगीत संस्थांची स्थापना :** स्वातंत्र्यपूर्व काळात संगीताचा प्रसार होण्यासाठी अनेक कलावंतानी संगीत संस्थांची स्थापना केली. अब्दुल करिम खाँ यांनी 'आर्यसंगीत विद्यालय', पं. गजाननबुवा जोशी यांनी 'शिवानंद संगीत प्रतिष्ठान' स्थापना केले. याचबरोबर गायनोत्तोजक मंडळी, 'पुणे गायन समाज', 'भारत गायन समाज' अशा अनेक संगीत मंडळांनी अनेक मैफिली घडवून आणल्या व संगीताच्या प्रसारासाठी मोलाचे योगदान दिले.

## २.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक छोटी-छोटी संस्थाने संघराज्यात विलीन झाली. याचाच परिणाम म्हणून पूर्वी जे संगीत तज्ज्ञ राजाश्रयी होते ते लोकाश्रयी झाले. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी उपेक्षित असलेल्या संगीताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासन आणि जनतेने पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला ते पुढीलप्रमाणे.

१) **शासनाकडून संगीताचे संवर्धन :** कलावंतांना संस्थानिकांचा जरी राजाश्रय मिळाला नाही तरी शासनाने त्यांना संरक्षण दिले. संगीत कलावंताना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रपती पदक देऊन गौरवले जाऊ लागले. संगीत नाटक अकादमी व ललित कला अकादमीची स्थापना झाली. संगीत क्षेत्रातील नवोदित कलावंतांना शासनाकडून शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या.

२) **लोककलावंताना राजाश्रय :** भारतीय संगीताचे मूळ हे लोकसंगीतात आहे. संस्कृतीचा आरसा असलेल्या लोककलांचे संवर्धन करण्याची जबाबदारी शासनाने उचलली. महाराष्ट्रातील अस्सल लोककला प्रकार लावणी, भारूड, गोंधळ, पोवाडा अशा कलाविष्कारांना लोकमान्यता नव्हती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासन दरबारी यांची नोंद घेतली. अशा कलावंतांना मानधन देऊन कला जतन केली. याचबरोबर कुमार गंधर्वांनी लोकसंगीताचा अभ्यास करून नवीन रागांची निर्मिती केली.

३) **संगीतविषयक ग्रंथांची निर्मिती :** स्वातंत्र्यानंतर क्रियात्मक व तात्त्विक या विषयांवर अनेक ग्रंथांचे लेखन झाले. आचार्य बृहस्पती यांचे राग रहस्य, भरत का संगीत सिद्धांत, पं. कुमार गंधर्व यांचे अनुपराग विलास, पं. विनायकबुवा पटवर्धन यांचे रागविज्ञान याचबरोबर पं. वामनराव देशपांडे, अशोक रानडे, स्वामी प्रज्ञानंद यांच्यासह अनेक लेखकांनी ग्रंथलेखन करून भारतीय संगीत साहित्य समृद्ध केले.

४) **दृक-श्राव्य माध्यमे व संगीत विकास :** दृक-श्राव्य माध्यमांनी संगीतक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. रेडिओच्या माध्यमातून संगीतसाधकांसाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ लागले. होतकरू कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेण्यात येऊ लागल्या. आकाशवाणी, दूरदर्शनवरून संगीतावर आधारित कार्यक्रम सादर होऊ लागले. दूरदर्शनवरून विविध संगीत समारोहांचे प्रत्यक्ष प्रक्षेपण केले जाते. दूरदर्शनवरून spirit of Unity concerts for Universal Integration यांसारखे अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनवरून अखिल भारतीय संगीत सभा प्रसारित होतात.

५) **संगीत महोत्सवांचे आयोजन व पुरस्कार :** शासन, संगीत संस्था, सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांच्या वतीने अनेक संगीत महोत्सवांचे आयोजन होत आहे. पुण्यातील सवाई गंधर्व महोत्सव, पुणे फेस्टिव्हल, वेरूळ महोत्सव, बाणगंगा महोत्सव, तानसेन संगीत समारोह अशा अनेक संगीत महोत्सवांच्या माध्यमातून भारतीय संगीत जनमानसात रुजवण्याचे काम होत आहे. आय. टी. सी. कंपनीकडून कोलकाता येथे नॅशनल रिसर्च ॲकॅडमी तर टाटा कंपनी नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् अकादमीची स्थापना करून संगीत जोपासण्याचा प्रयत्न होत आहे. सूरसिंगार संसदेकडून सूरमणी हा किताब देण्यात येतो. त्याचबरोबर भारत सरकारकडून प्रोत्साहन म्हणून विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. जसे; पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न.

६) **शालेय शिक्षण व संगीत :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संगीत विषयाचा प्रसार होण्यासाठी शालेय शिक्षणात संगीत विषय अनिवार्य केला आहे. शाळांबरोबरच महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर आज संगीत विषय शिकवला जात आहे. विविध संगीत संस्थांच्यावतीने गायन, वादन व नृत्य विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात. यामुळे अनेक विद्यार्थी कलाकार म्हणून पुढे येत आहेत.

७) **वैज्ञानिक शोध व संगीत :** आधुनिक काळात रेडिओ, टेपरेकॉर्डर व दूरदर्शनबरोबरच आज संगणक व इंटरनेटमुळे घराण्यांची बंधने शिथिल झाली आहेत. इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांच्या निर्मितीने संगीतक्षेत्रात आमूलाग्र बदल घडले. इलेक्ट्रॉनिक्स तानपुरा, लहेरा यंत्र, इलेक्ट्रॉनिक्स तबला, हवाई गिटार, सिंथेसायझर अशा वाद्यांच्या निर्मितीमुळे संगीतशिक्षणात क्रांतीची

लाट उसळली. याचबरोबर ध्वनिमुद्रण, ध्वनिविस्तारक यंत्रे अशा अत्याधुनिक तंत्रांचा वापर केल्यामुळे वाद्ययंत्राच्या सादरीकरणात मिंड, गमक, खटका यासारख्या अलंकारिक बाबींच्या पेशकारीवर प्रभाव पडला आहे. याशिवाय संगीतात संशोधन करण्याच्या दृष्टीने सौंदर्यशास्त्र, संगीत व रोग चिकित्सा, संगीत व योग, संगीत व अध्यात्म, संगीत व मनोविज्ञान, संगीताचा इतिहास, घराणे अशा अनेक विषयांवर शोधकार्य सुरू आहे. ज्या माध्यमातून अनेक ग्रंथ जन्माला येत आहेत. संगीत, संगीत कलाविहार, बागीश्वरी, धृपद वर्णिकी, इंडियन म्युझिक जर्नल, छायानट, संगीत सेतू अशी अनेक संगीतविषयक मासिके संगीताच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत.

## स्वाध्याय

**प्र.१ योग्य जोड्या जुळवा.**

| अ.क्र. | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| १ | संगीत सार | महंमद रझा |
| २ | संगीत रागकल्पद्रुम | कुमार गंधर्व |
| ३ | म्युझिक फ्रॉम व्हेरिअस ऑथर्स | आचार्य बृहस्पती |
| ४ | अनुपराग विलास | कृष्णानंद व्यास |
| ५ | नगमाते आसफी | जयपूरचे राजे प्रतापसिंह |
| ६ | राग रहस्य | सुरेंद्र मोहन टागोर |
| ७ | राग विज्ञान | विनायकबुवा पटवर्धन |

**प्र.२ 'स्वातंत्र्यपूर्व काळातील संगीताची स्थिती' याविषयी माहिती लिहा.**

**प्र.३ भारतीय संगीत जनमानसात कोणकोणत्या माध्यमांतून रुजवले जात आहे, याविषयी अधिक माहिती मिळवा.**

**प्र.४ थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय संगीताच्या अभ्यासासाठी महत्वाचे चार कालखंड कोणते ?

(२) स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये कोणत्या संगीतविषयक ग्रंथांची निर्मिती झाली ?

(३) संगीताच्या प्रसाराच्या दृष्टीने पं. वि. दि. पलुस्कर आणि पं. वि. ना. भातखंडे यांनी केलेल्या योगदानाचा आढावा घ्या.

(४) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाकडून संगीताच्या संवर्धनाच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले जात आहेत ?

**प्र. ५ संगीताचा प्रसार होण्यासाठी कोणत्या योजना राबवता येतील, याविषयी तुमचे विचार मांडा.**

**उपक्रम : पं. वि. ना. भातखंडे व पं. वि.दि. पलुस्कर यांनी लिहलेल्या पुस्तकांची नावे इंटरनेटवर शोधा.**